# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/09/2023 (शनिवार) सकाळ

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. खापरखेडा** :— दिनांक २९/०८/२०२१ चे १८.५८ वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रल्हाद सेवकराम ठाकरे, वय ५४ वर्ष, रा. पिपळा डाक बंगला ता. सावनेर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अप. क्र. ३८४/२०२१ कलम ३०२, ३०९ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील दिनांक २९/०८/२०२१ चे १३/०० वा. दरम्यान **आरोपी नामे— रामदास झिंगुजी मेश्राम, वय ५८ वर्ष, रा. संजय गांधीनगर यशोधरा नगर नागपुर ह. मु. शिवली बोधी भिक्खु निवास पिपळा डाक बंगला ता. सावनेर** व मृतक नामे— सौ. कुसुम सुनिल चव्हान, वय ४५ वर्ष, रा. इंदीरा नगर हे दोघेही बौध्द भिक्खु असुन त्यांच्यामध्ये मागील १२ वर्षापासुन प्रेम प्रकरण व शारीरीक संबंध होते. मागील काही दिवसापासुन त्यांचे घटनास्थळावरील विहारामध्ये वास्तव्य होते. यातील आरोपीने मृतक हीच्या मोबाईलवर काही इसमांचे अश्लिल मॅसेज बघीतले व त्याबाबत आरोपीने मृतक हीला विचारणा केली असता मृतक हीने उलट आरोपीस त्यांच्यात पुरुषार्थ उरला नसल्याचे म्हटल्याने नमुद घटना ता. वेळी आरोपी व मृतक यांच्यात वादविवाद होवुन आपसात मारामारी होवुन आरोपीने हातोडीने व चाकुने मृतकच्या गळयावर व शरीरावर ठिकठिकाणी वार करुन जिवानीशी ठार मारले. सदर घटनेनंतर आरोपीने विहारातील भिंतीवर लागलेल्या हुकला नायलॉन दोरीने गळफास घेण्याचा प्रयत्न केला असता सदर हुक तुटल्याने आरोपीने घटनास्थळाजवळील विहीरीमध्ये उडी टाकुन जिव देण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक अभिषेक अंधारे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. जिल्हा न्यायाधीश कोर्ट क्र. ०६ आणि जिल्हा व सत्र न्यायालय श्री. पावसकर सा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनांक ३०/०९/२०२३ रोजी मा. जिल्हा न्यायाधीश कोर्ट क्र. ०६ आणि जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. पावसकर यांनी वरील सदर गुन्हयातील आरोपीस कलम ३०२ भादवि मध्ये आजीवन कारावास व १०,०००/— रु. दंड, दंड न भरल्यास ०३ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. दुबेसा यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस नायक सचिन चौधरी पो.स्टे खापरखेडा यांनी मदत केली आहे.

# शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. एम आय डी सी बोरी** :— दिनांक १२/०९/२०१७ चे २१/२० वा. दरम्यान फिर्यादी नामे— फारूख अहमद नजीर अहमद, वय ३२ वर्ष, रा. आठवडी बाजार उमरखेड जि. यवतमाळ (बस ड्रायव्हर) यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अप. क्र. ३३०/१७ कलम ३५३, ३२३, ४२७, ३४ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी हे शासकिय बस क्र. MH-14/BT-4407 गाडी नागपूर आगार येथुन नांदेड करीता जात असता टाकळघाट शिवारामध्ये मागवुन येणारा आयसर क्र. MH-35/K-3766 च्या गाडी चालकाने शासकिय बस ला ओव्हरटेक करून शासकिय बस च्या समोर आपली आयसर गाडी उभी केली. फिर्यादीने मला साईड का दिली नाही म्हणुन नमुद आरोपी नामे— १) जावेद सैय्यद अमजद अली सैय्यद वय ३० वर्ष, २) विजय तातोबा बाबरे वय ३२ वर्ष दोन्ही रा. भंडारा यांनी फिर्यादीला हातबुक्कीने व काठीने मारपीट करून शासकिय बसच्या समोरील काच फोडुन नुकसान केले.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस हवालदार प्रमोद बन्सोड पो.स्टे. एमआयडीसी बोरी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. श्रीमती जैन मॅडम अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक ३०/०९/२०२३ रोजी मा. श्रीमती जैन मॅडम अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर यांनी वरील सदर गुन्हयातील दोन्ही आरोपीला कलम ३५३, ४२७, ३४ भादवि. मध्ये १५०००/रू. दंड तसेच ३ वर्ष मुदतीचा चांगल्या वर्तणुकीचा बंधनपत्र घेण्यात आलेले आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. गादेवार यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवालदार अनिल व्यवहारे पो.स्टे. एमआयडीसी बोरी यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**